पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याच्या योजनेतील सन २०१८-१९ मधील अखर्चित राहीलेला निधी सन २०१९-२० मध्ये वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयसीएस -२०१९/प्र.क्र.१२०/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
तारीख: २७ ऑगस्ट, २०१९

वाचा -

१) कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्र.पदसातत्य-२०१९/प्र.क्र.३८/११-अे, दि.२७.०२.२०१९
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ -३, दि.०१.०४.२०१९
३) भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग यांचे पत्र २-१/२०१९-ASI-ES, दि.१७.०५.२०१९
४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.सां.-४/आयसीएस/४६/२०१९, दि.२७.०५.२०१९

प्रस्तावना -

पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याच्या योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेतील २२ अस्थायी पदे दिनांक १ मार्च, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२. पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना (२४०१ २५७८) ही १०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना असून सन २०१९-२० मध्ये राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ३१ मार्च, २०१९ अखेर रु.१०.४१ लाख इतकी रक्कम अखर्चित म्हणून शिल्लक आहे. केंद्र शासनाने त्यांच्या दि.१७.०५.२०१९ च्या पत्रान्वये सन २०१८-१९ मधील अखर्चित राहीलेली रु.१०.४१ लाख इतकी रक्कम सन २०१९-२० या वर्षामध्ये खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे. तरी सन २०१८-१९ या वर्षातील रु.१०.४१ लाख इतकी अखर्चित रक्कम सन २०१९-२० या वर्षामध्ये केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार तसेच कृषि आयुक्तालयाने केलेल्या विनंतीनुसार ०१-वेतन या बाबीवर खर्च करण्यासाठी संगणक प्रणालीवर (BDS) वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना (२४०१ २५७८) ही १०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना असून सन २०१८-१९ या वर्षातील रु.१०.४१ लाख इतकी अखर्चित रक्कम सन २०१९-२० या वर्षामध्ये केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार ०१-वेतन या बाबीवर खर्च करण्यासाठी वितरीत करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत खर्च पुढील लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा -

"मागणी क्रमांक डी-३, २४०१, पीक संवर्धन,
(००) (१११) कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी
(००) (११) पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना,
(१०० टक्के केंद्र पुरस्कृत) (२४०१ २५७८)"

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण) यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या मान्यतेने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ अनुक्रमे क्रमांक अनौप संदर्भ क्र. १०३/१४३१,दि.२२.७.२०१९ व अनौप संदर्भ क्र. १८७/२०१९/व्यय-१,दि.२.८.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२७१५०६४८३३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.08.27 15:13:28 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
३. कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
६. सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
७. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
८. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१०.वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११.नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२.उप सचिव (११-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३.कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३
१४. निवड नस्ती, का.११-अे.